मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्त:

म प्र

# हितगुज

अंक ३१ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● सप्टेंबर १९९७

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## हितगुजचा रत्नागिरी अधिवेशन विशेषांक

हितगुजचा पुढील (डिसेंबर) अंक सुमारे पाऊणशे पानांचा, माहितीपूर्ण व संग्राह्य असा निघणार आहे. हा अंक नोव्हेंबर मध्ये प्रसिद्ध होईल. यात खालील मजूकर असेल -

१. कोकणस्थ / चित्तपावनांचे मूळ स्थान, कुलदैवते, कुळाचार.
२. चित्पावनी भाषेचा नमुना.
३. रत्नागिरीचे स्थान महात्म्य.
४. कोकण रेल्वे व कोकणभूमीचा विकास
५. कोकणचे भवितव्य, कोकणात यशस्वी रीतीने करता येण्याजोगे उद्योगधंदे.
६. कोकणात राहून मेहनतीने व चिकाटीने उद्योग व्यवसाय करीत असणाऱ्या कुलबांधवांचे अनुभव.
७. उद्योग-व्यवसाय, साहित्य, संगीत, कला अशा विविध क्षेत्रातल्या कर्तबगार कुलबांधवांचे परिचय आणि अर्थातच
८. रत्नागिरी अधिवेशनाचा सचित्र वृत्तान्त.

या अंकाचा खर्च भागवण्यासाठी कुलबांधवांना खालील मार्गांनी **मदतीचे आवाहन** आहे.

१. उद्योग व्यावसायिकांकडून व्यावसायिक जाहिरात.
२. सर्वांकडून शुभेच्छा जाहिरात.

**जाहिरातीचे दर**

पूर्ण पान - रु. २०००    १/२ पान - रु. १०००

१/४ पान - रु. ५००    १/८ पान - रु. ३००

शुभेच्छा देणाऱ्यांच्या यादीत **दोन ओळीत नाव व संक्षिप्त पत्ता. (फक्त गाव)** रु. २००

तसेच कोकणात राहून चिकाटीने उद्योग-व्यवसाय करणाऱ्या कुलबांधवांनी **बदलत्या वातावरणात आपण काय केले व काय करता येणे शक्य आहे** याबाबतचे आपले अनुभव, विचार या अंकात प्रसिद्धीसाठी *२५ ऑक्टोबर*, १९९७ पर्यंत **(स्वत:च्या फोटोसह) पाठवावे असेही सर्व कुलबांधवांना आवाहन आहे.**

## रत्नागिरी अधिवेशनासाठी स्वागत समिती

१. **कमलाकर नरहर** (पृ.४६), ठाणे - **स्वागताध्यक्ष**
२. **डॉ. भालचंद्र सखाराम** (पृ.४३) - मुटाट
३. **श्रीधर केशव** (पृ.३९६) - संपादक किरात, वेंगुर्ले
४. **डॉ. सुधीर विष्णु** (पृ.४३७) - कणकवली
५. **आनंद माधव** (पृ.४६) - रत्नागिरी
६. **सुरेश पांडुरंग** (पृ.३२३) - रत्नागिरी
७. **बाळकृष्ण नारायण** (पृ.४०५) - सावंतवाडी
८. **दत्तात्रय धुंडीराज** (पृ.४७) - खेड
९. **भास्कर नरहर** (पृ.४६) - रत्नागिरी, **निमंत्रक**

**मराठे प्रतिष्ठान**

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी कार्यकारी मंडळाच्या सभा होतात. या वेळी कोणीहि कुलबांधव प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी येऊ शकतो. (सायं. ५) मागील तिमाहीत ८ व २२ जून, १३ व २७ जुलै आणि ९ व १७ ऑगस्ट रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. ९ ऑगस्टला पुणे शाखेचे प्रमुख **वामन आत्माराम** (पृ.३६६) व त्यांचे ४ सहकारी मुद्दाम उपस्थित होते. या सभेत रत्नागिरी अधिवेशन, स्वयंउद्योग मेळावे व प्रतिष्ठानपुढील अन्य कार्य यांबाबत विशेष चर्चा झाली. तसेच प्रतिष्ठानमार्फत कोकणात जागा विकत घेऊन अथवा भाड्याने/कराराने कुलबांधवांसाठी अल्पकालीन निवास/भोजन यांची व्यवस्था करण्याबाबतहि चर्चा झाली.

**स्वयंउद्योजग मेळावे - चर्चासत्रे**

१९ जुलै रोजी मुंबईतल्या पश्चिम रेल्वेवर राहणाऱ्या कुलबांधवांसाठी अंधेरी येथे तसेच ३० ऑगस्ट रोजी मध्य रेल्वेवर राहणाऱ्या कुलबांधवांसाठी मुलुंड येथे असे दोन स्वयंउद्योजक मेळावे-चर्चासत्रे झाली. प्रतिसाद चांगला होता. याच अंकात या चर्चासत्रांचा वृत्तान्त दिला आहे.

**हितगुज**

हितगुजने आता ६०० वर्गणीदारांचे लक्ष्य पार केले आहे. पण अजून १००० वर्गणीदारांचे उद्दिष्ट बहोत दूर आहे. मात्र सर्व कुलबांधवांनी आपापल्या **बहिणींना भाऊबीज भेट म्हणून हितगुजची वर्गणी** पाठवल्यास दिल्ली बहोत दूर नाही. आपल्या भेटीचा उल्लेख करुन पुढील अंक त्यांना पाठवला जाईल. **एवढे सहकार्य करणार ना?**

**देणग्या**

कुलबांधवांकडून प्रसंगानुरूप खालीलप्रमाणे देणग्या प्रतिष्ठानकडे आल्या.

**हितगुज संवर्धन निधीसाठी**

१. श्री. अरविंद शंकर, अमेरिका (पृ. १३२) रु. ४५४८
२. सौ. उर्मिला दिनकर, पुणे (पृ. २७९) रु. ४००
३. श्री. सदानंद प्रभाकर विद्वांस (पृ. ६५८) रु. २००

**शिक्षण निधीसाठी**

४. श्री. प्रकाश गणेश विद्वांस (पृ. ६४५) अहमदाबाद रु. ५०१

> **क्षमस्व 'गवि'**
>
> मागील जून १९९७ च्या अंकांत प्रतिष्ठान वृत्त देतांना आदर्श माता निबंधस्पर्धा पारितोषिकांसाठी दिलेल्या देणगीचा उल्लेख करताना प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष **श्री. गणेश विनायक** (पृ. ११५) **यांचे नाव 'गणेश' ऐवजी 'गजानन' असे चुकीचे छापले** गेले या चुकीबद्दल क्षमस्व. - संपादक.

५. श्री. अनंत रामचंद्र (पृ. ३९२) रु. १०१
दादर, मुंबई, वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त
६. श्री. गजानन चिंतामण, पुणे (पृ. १२९) रु. १०१
वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त

**'खुडीपार' मधील पूरग्रस्त कुलबांधवांसाठी**

७. श्री. अशोक यशवंत (पृ.३२१) रु. १००० डोंबिवली

**वैद्यकीय मदत**

चिंचवड पुणे येथील कुलबांधव **माधव वासुदेव** (पृ.३८६) **यांची पत्नी मृणालिनी** हिला कॅन्सर उपचारासाठी रु. १०,००० वैद्यकीय मदत २३.८.९७ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेत मंजूर करण्यात आली.

**शैक्षणिक कर्ज (बिनव्याजी)**

गेल्या तिमाहीत खालाप्रमाणे शिक्षण खर्चासाठी बिनव्याजी कर्जे मंजूर करण्यात आली.

१. प्रतिष्ठानचे नंदुरबार, जि. धुळे येथील सभासद **विद्याधर विनायक** (पृ.१५३) **यांची मुलगी भारती** हिला कॉम्प्युटर शिक्षणासाठी रु. ५,००० पर्यंत (गरजेनुसार)

२. प्रतिष्ठानचे पुण्यांतील सदस्य **विनायक शंकर खांबेटे** (पृ.६७६) **यांचा मुलगा किरण** याला बी. ई. (इलेक्ट्रिकल- तृतीय वर्ष) शिक्षणासाठी रु.१०,०००

३. प्रतिष्ठानचे देवळाली जि. नाशिक येथील सदस्य **किरण सीताराम** (पृ.२९७) **यांचा मुलगा सचिन** याला इंजिनियरिंग (तृतिय वर्ष) शिक्षणासाठी रु.१०,०००

❖



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

## मानसन्मान

### उत्कृष्ट डेव्हलपर जाईल

प्रतिष्ठानचे **पुण्यातील सभासद विनायक रामचंद्र जाईल** (पृ. ७५५) यांना पुण्यातील युवा चेतना मंच या संस्थेतर्फे मे १९९७ मध्ये उत्कृष्ट डेव्हलपर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. २५ वर्षाहून अधिक काळ पुण्यातील सुप्रसिध्द जाईल टयुशन क्लासेस मधून विद्यादानाचे कार्य केल्यानंतर आता ते त्यांच्या दोन मुलांच्या सहकार्याने हा नवीन व्यवसायहि तितक्याच समर्थपणे चालवीत आहेत याची ही पावतीच म्हणावी लागेल. त्यांची ही कामगिरी मराठे परिवाराला अभिमान वाटावा अशीच आहे.

### 'संचार श्री' विद्वांस

विरार (प) जि. ठाणे येथील **कुलबांधव सुरेश श्रीधर विद्वांस** (पृ. ६४८) यांना महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. प्रमोद नवलकर यांच्या हस्ते नेहरू सेंटर, वरळी, मुंबई येथे २१ मे १९९७ रोजी आयोजित केलेल्या समारंभात 'संचार श्री' पुरस्कार म्हणून चांदीचे पदक, प्रशस्तीपत्रक व रोख रकमेचे पारितोषिक देण्यात आले. महानगर टेलिफोन निगम, महाराष्ट्र दूरसंचार परिमंडळ, पश्चिम दूरसंचार प्रोजेक्ट आणि टेलिकॉम फॅक्टरी मुंबई यांच्या सौजन्याने एकूण २० जणांना हा पुरस्कार देण्यात आला.

श्री. विद्वांस माजी सैनिक असून १९८२ पासून ते देवनार, मुंबई येथील दूरसंचार कारखान्यात सुरक्षा निरीक्षक म्हणून काम करीत आहेत.

### रोह्याचे जज्ज दिलीप शिवराम

बेळगाव येथे वकिली करणारे कुलबांधव दिलीप शिवराम (पृ. ४७१) यांची रोहा जि. रायगड येथे जज्ज म्हणून नियुक्ती झाली आहे.

### शाबास 'अजिंक्य'

कोल्हापूर येथील सभासद **भालचंद्र कृष्ण** (पृ.४२७) **यांचा नातू अजिंक्य अरुण कुलकर्णी**, कोल्हापूर, याने मार्च १९९७ मधे झालेल्या १२वी (सायन्स) परीक्षेत ८०% गुण मिळवले. १०वी च्या परीक्षेतही त्याने ९१% गुण मिळवले होते. गुणवत्ता यादीतला त्याचा क्रमांक एक टक्क्याने हुकला होता. या यशाबद्दल कुमार अजिंक्यचे अभिनंदन आणि पदवी परीक्षेतही असेच यश मिळून हॅट्रिक व्हावी ही शुभेच्छा!

### आदर्श माता पारितोषिक रु. १०००

मराठे प्रतिष्ठानच्या माध्यमातून एका आदर्श मातेला प्रतिवर्षी रु.१००० चे पारितोषिक आपल्या आईच्या नावाने देण्याची एका कुलबांधवाची इच्छा आहे. याबाबतचे **निकष खालीलप्रमाणे.**

१) आपली मुले सुसंस्कृत, सुशिक्षित, सदाचारी, आणि स्वावलंबी व्हावी म्हणून जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न.

२) संसार सुखी व समाधानी होण्यासाठी दाखवलेले सामंजस्य / सोशिकपणा, केलेले समझोते आणि गरजेच्या वेळी अर्थार्जनातील सहभाग.

३) सामाजिक, सांस्कृतिक, सार्वजनिक क्षेत्रातील कार्य/कर्तृत्व,

४) पारितोषिकपात्र माता **सासरची अथवा माहेरची मराठे परिवारातली** (म्हणजे विद्वांस, खांबेटे, चक्रदेव, जोशी, जाईल, फडणीस या पोट आडनावांसह) असावी.

आपली आई या पारितोषिकास पात्र आहे असे वाटणाऱ्या मुला-मुलींनी आईच्या व स्वत:च्या माहितीसह मराठे प्रतिष्ठान यांना लिहावे.

मुला-मुलींव्यतिरिक्त इतरांनीही त्यांच्या परिचयातल्या आदर्श मातेची माहिती (अथवा पत्ता) प्रतिष्ठानला कळवायला हरकत नाही.

**आदर्श माता पारितोषिकासाठी असा पाकिटवर स्पष्ट उल्लेख करून पत्र पाठवण्याची अखेरची तारीख ३० नोव्हेंबर १९९७.**

### म.प्र. बोर्डात १०वी प्राची

प्रतिष्ठानचे सभासद **अरुण वसंत** (पृ. २२६) **उज्जैन, यांची मुलगी प्राची** १९९६ मार्च मधे झालेल्या १०वी च्या परीक्षेत म.प्र. बोर्डात १४वी व उज्जैन विभागात १ली आली. पुढच्या वर्षी १२वीच्या परीक्षेतही तिला असेच घवघवीत यश मिळो ही शुभेच्छा.

### जीवेत शरद: शतम्

**मराठे प्रतिष्ठानचे पूर्व विश्वस्त मोहन सदाशिव** (पृ. ३६५), सध्या वास्तव्य दिल्ली यांनी ३१-८-१९९७ रोजी ६१व्या वर्षात पदार्पण केले. ते सध्या सहकारी साखर कारखान्यांच्या राष्ट्रीय फेडरेशनचे कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो अशी अखिल मराठे परिवारातर्फे प्रार्थना. जीवेत शरद: शतम्।



Marathe Pratishthan

### पत्नीच्या देखभालीसाठी

विलेपार्ले मुंबईतील आपले कुलबांधव, **पद्माकर विद्वांस** (पृ. ६२९), मॅनेजर बडोदा बँक, चकाला शाखा, अंधेरी पूर्व, यांना त्यांच्या आजारी पत्नीची दिवसभर देखभाल करण्यासाठी शक्यतो ब्राम्हण वा पोटशाखेतील वयस्कर, विनापाश बाईची गरज आहे. योग्य मोबदला, जेवणखाण अर्थातच मिळेल. कुलबांधवांनी त्यांच्या ओळखीत अथवा माहितीत अशी एखादी बाई असल्यास श्री. विद्वांस यांचेशी संपर्क साधावा. **(घरचा फोन ८३२ ४६ ६८)**

### नांदा सौख्यभरे

**चौल जि. रायगड येथील सभासद सुरेश नारायण विद्वांस** (पृ. ६६४) **यांची मुलगी अर्चना** हिचा विवाह पुण्यातील एका खाजगी कंपनीतील अकौंटस ऑफिसर सचिन राजाराम लेले यांचेशी दि. ९ मे १९९७ रोजी साजरा झाला.

**पलुस जि. सांगली येथील कुलबांधव नारायण दामोदर** (पृ. ५५३) **यांची मुलगी कांचन उर्फ धनश्री** हिचा शुभविवाह सौदाळे, जि. सिंधुदुर्ग येथील महेश कृष्णाजी गोखले यांचेशी १५ जून १९९७ रोजी सांगली मुक्कामी साजरा झाला.

**नवविवाहित वधूवरांस मराठे परिवारातर्फे शुभेच्छा.**

### सहवेदना

१) **प्रतिष्ठानचे सभासद देवीदास गंगाधर** (पृ.४७) **नागपूर यांचे वडील गंगाधर** यांचे २४.१०.१९९६ रोजी दु:खद निधन झाले.

२) सामाजिक बांधिलकीचे भान सुटू न देता ग्रुप कंपन्यांचा उत्तम व्यवहार करणारे उद्योजक, प्रतिष्ठानचे जळगांव येथील सभासद **अच्युत गोविंद खांबेटे** (पृ.६९७) यांचे १४.११.१९९६ रोजी वृध्दापकाळामुळे निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. सांगलीच्या बिझिनेस एक्सप्रेस साप्ताहिकाने त्यांना व्यापार सेवा पुरस्कार देऊन गौरवित केल्याच्या निमित्ताने सप्टेंबर १९९६ च्या हितगुजमध्ये दिलेला त्यांचा परिचय वाचकांच्या स्मरणात असेलच. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो.

३) प्रतिष्ठानचे विश्वस्त **आनंद यशवंत** (पृ.२७७) **यांचे वडील यशवंत विठ्ठल उर्फ मामा मराठे** यांचे **१३ जून १९९७** रोजी वृध्दापकाळामुळे निधन झाले. ठाणे येथील यशवंत विठ्ठल मराठे प्रा. लि. या प्रसिध्द सराफी पेढीचे ते मालक होते. दुकानाच्या फायद्यातील १० टक्के भाग गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत म्हणून देण्यासाठी वेगळा ठेवला जातो, हे त्यांचे वैशिष्टय. मृत्युसमयी त्यांचे वय ८३ वर्षे होते. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो.

४) प्रतिष्ठानचे सभासद **नारायण त्र्यंबक** (पृ.१७५) **यांचे बंधु अनंत** यांचे १६.७.१९९७ रोजी सानपाडा, नवी मुंबई येथे निधन झाले. ते रिटायर्ड सबपोस्टमास्तर होते.

**वरील सर्वांच्या कुटुंबीयांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे.**

### ....... पुत्रे मित्रवदाचरेत् - समस्यापूर्ती

जून अंकातील समस्यापूर्तीसाठी वरील काव्यपंक्ती दिली होती. सहा स्पर्धकांनी पूर्ण श्लोक व अर्थ लिहून पाठवला. त्यात दोन गृहिणी होत्या. अर्थात् त्यांना पारितोषिक नव्हते; ते होते २० वर्षाखालील स्पर्धकांना.

सर्वांनीच श्लोक बरोबर लिहिला, त्याचा मतितार्थहि बरोबर लिहिला. पण श्लोक लिहितांना तो शुद्धलेखनाच्या दृष्टीने बिनचूक फक्त तीनच विद्यार्थ्यांनी लिहिला. त्यांना खालीलप्रमाणे पारितोषिके देण्यात येत आहेत :-

**पहिले बक्षिस रु. २५**
कुमार निरंजन प्रभाकर (पृ.१२०), वडाळा, मुंबई
**दुसरे बक्षिस रु. १५**
कुमार विवेक सुधीर (पृ.२०), कराड
**तिसरे बक्षिस रु. १०**
कुमार सौरभ सुरेश (पृ.८७), डोंबिवली.

यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन! सर्वच स्पर्धकांचे आभार, त्यांच्या सहभागाशिवाय स्पर्धा यशस्वी कशी होणार? - संपादक.

पूर्ण श्लोक व त्याचा अर्थ खाली दिला आहे. -

लालयेत् पञ्चवर्षाणि, दशवर्षाणि ताडयेत्।
प्राप्ते तु षोडशे वर्षे, पुत्रे मित्रवदाचरेत्॥

अर्थ : मुलांचे पाच वर्षांपर्यंत लाड करावे, त्यानंतर दहा वर्षे मारावे (योग्य तेथे), परंतु सोळावे वर्ष लागल्यानंतर मात्र त्यांच्याशी मित्राप्रमाणे (बरोबरीच्या नात्याने) वागावे.

### आदर्श मातेला दाद - अमेरिकेतून !

सौ. शुभदा जोशी यांचे आदर्श माताविषयक विचार (हितगुज जून १९९७) विशेष आवडले. त्यांची भाषा सोपी, सुटसुटीत वाटली. शेवटचा परिच्छेद फारच सुंदर.

**- विनायक गोपाळ** (पृ.६९) सनीव्हेल, कॅलिफोर्निया.



Marathe Pratishthan

# खुडीपाट करांनी भोगलेला प्रलयंकारी महापूर

- वसंत रावजी (पृ. ११७), खुडीपाट.

***३० जून १९९७ रोजी दुपारी आचरा खाडी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नदीकिनाऱ्यावरील सुमारे दीडशे घरांचे व शे-सव्वाशे गोठ्यांचे अपरिमित नुकसान झाले. यावेळी खुडीपाट मधे रहाणाऱ्या सर्व सहा मराठे कुटुंबीयांची घरे, गोठे, इ. नामशेष झाली. त्यापैकी एक आपदग्रस्त श्री. वसंत रावजी मराठे, मु. खुडीपाट, पो. खुडी, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग - ४१६ ६११ यांनी वर्णन केलेली ही परिस्थिती. - संपादक.***

३० जून १९९७, सोमवार, ज्येष्ठ व. ११. खुडीपाटवासीयांच्या जीवनातील सर्वात काळाकुट्ट दिवस. मनात कायमचे घर करून रहाणारा दिवस. इतिहासात नोंद व्हावी असा दिवस.

दुपारी दोन वाजेपर्यंत जर कुणी आम्हाला खुडीपाटवासी मराठे कुटुंबियांना सांगितले असते की आज रात्री तुम्ही बेघर होणार आहात, तर आम्ही त्याची चेष्टा केली असती. येथे वस्ती केल्यापासून आमच्या आठ पिढ्या याच वास्तूत सुखेनैव राहिल्या. माझ्या आठवणीत सुद्धा येथे आलेले किमान चार पूर मी पाहिले. एका ठराविक पातळीपर्यंत पाणी येते, त्या पातळीच्या फूट, अर्धाफूट ते कमी जास्त होते, त्यानंतर ओसरू लागते. १९३१ चा पूर हा सर्वात मोठा पूर असे माझी आजी आम्हाला सांगत होती. देवावरील तिच्या श्रद्धेमुळे तिने त्यावर उपाय सुद्धा सांगितला.

नदी कोपली, आपली चूक झाली की ती असे विक्राळ स्वरूप धारण करते. आपण आपली चूक कबूल करून तिची खणा-नारळाने ओटी भरून ती तिला अर्पण केली की, ती आपली पातळी सोडून वर येत नाही. तिची पातळी हळू हळू कमी होऊ लागते व पुढील काही तासांत पूर कमी होतो. आजपर्यंत असे झाले होते, आजही असेच काही घडेल अशी आमची ठाम समजूत होती. मनुष्य आपल्या कल्पनेत सुद्धा वाईटाची काही ठराविक मर्यादेपर्यंतच कल्पना करू शकतो.

आज सुध्दा आम्ही अशीच कल्पना केली की पाणी, आजपर्यंत आलेल्या पुराच्या पातळीपेक्षा फूट, दोन फूट, तीन फूट वाढेल. परंतु ते सात, आठ फूट आपली मर्यादा सोडून वाढेल, अशी कल्पना आमच्या वैऱ्याच्या मनांत सुध्दा आली नसती. पण आजचा दिवस हा ह्या पूर्वी आलेल्या दिवसांपेक्षा वेगळा होता. नियतीच्या मनात आमचे ह्या पूर्वी बांधलेले अंदाज चूक ठरविण्याची इच्छा होती.

दुपारचा जेवणानंतरचा मोकळा वेळ वामकुक्षीत घालविण्याऐवजी आम्ही चार, सहा लोक पत्यांचा डाव मांडत असू. आजसुध्दा असाच डाव मांडला होता. दुपारी १२.३०-१.०० वाजल्यापासून मुसळधार पावसाला सुरवात झाली. असा मुसळधार पाऊस, या डोंगर-दऱ्यानी वेढलेल्या वाडीत अनेक वेळा पडतो. तीन, चार तास तो अखंड पडत असतो व त्यानंतर दमून तो कमी होतो. क्वचितच पाणी आपली पायरी सोडून वर येते. तुफान आवाज करीत, खळाळत दुथडया भरून

---

**'खुडीपाट' मधील एक आपदग्रस्त कुटुंबीय म.प्र.चे सभासद श्री. भास्कर दिनकर (पृ.११४) यांना प्रतिष्ठानचे पत्र -**

श्री. भास्करराव यांस, स.न.वि.वि.

मराठे प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री. ग. वि. मराठे यांना त्यांचे भाचे श्री. बापू काशिनाथ केळकर, मु. दाभोळे यांचे कडून आपल्या भागांतील अतिवृष्टीबाबत पत्र आले आहे. (पुढील पानावर पहा.) ते पत्र मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळापुढे विचारार्थ ठेवले. पत्रांत वर्णन केलेली स्थिती मन हेलावून टाकणारी आहे. 'बापाने मारले आणि पावसाने झोडपले तर जाणार कुठे?' या म्हणीचा उत्तरार्ध डोळ्यांपुढे उभा राहतो.

तरीपण प्रेमाची नाती काही तुटत नाहीत. ती रक्ताच्या नात्यापेक्षा अधिक घट्ट असतात. आपण आमचे कुलबंधु आहांत तेव्हा आपले दुःख ते आमचेच दुःख आहे याबद्दल खात्री ठेवा.

प्रतिष्ठान या संकटकाळी आपणाला रु.५००० पर्यंत मदत देऊ इच्छित आहे. मदत कोणत्या स्वरूपात आपल्या कुलबांधवांना जास्तीत जास्त उपयोगी पडू शकेल याची कल्पना कृपया उलट टपाली कळविणे. म्हणजे पुढील कार्यवाही त्वरेने करण्यात येईल.

- आपला नम्र, वि. के. मराठे, कार्यवाह.



Marathe Pratishthan

**बापू काशिनाथ केळकर यांच्या ग. विं.ना लिहिलेल्या पत्रांतील मजकूर.**

'खुडीपाट' चे मराठे मंडळींची सर्व घरे वाहून गेली असून त्यांचे आता पुनर्वसन करणे जरूरीचे आहे. फक्त दागिने व पैसे जे काही होते तेवढेच ते वाचवू शकले. बाकी घरातील सर्व वस्तू वाहून गेल्या. सगळ्या घरांच्या भिंती पडून जमीनदोस्त झाल्या. सगळयांकडे वर्षभर पुरेल इतके धान्य होते ते सगळे भिजून, कुजून गेले. कपडे वगैरे काही ढिगाखाली असतील पण बरेच वाहून गेले. फक्त अंगावर जे कपडे होते तेवढेच शिल्लक राहिले. झोपण्याचे सर्व साहित्य, भांडीकुंडी, सर्व वाहून गेले. एकंदर पाटावर १५ घरे पडली. पैकी ६ मराठ्यांची. त्यांची नावे -

| | | |
|---|---|---|
| १. गोपाळ श्रीराम (पृ. ११९) | घरात माणसे | ६ |
| २. भास्कर दिनकर (पृ. ११४) | -''- | ४ |
| ३. वसंत रावजी (पृ. ११७) | -''- | १ |
| ४. अंकुश रामचंद्र (पृ. ११५) | -''- | २ |
| ५. परशुराम विष्णु (पृ. ११६) | -''- | २ |
| ६. जगन्नाथ वामन (पृ. ११५) | -''- | १ |

ते वाहत असते, परंतु आम्हा मराठयांना त्याचे भय वाटत नाही. कणखर मनाचे मराठे त्याच्याशी गेली अनेक वर्षे सामना करत आहेत. आजसुध्दा असेच घडेल, असे वाटत होते.

दुपारी पावसाचा जोर वाढत असलेला पाहून, आम्ही आमचा खेळ थांबविला. पूर वाढणार आहे व त्या दृष्टीने सतर्क रहाणे जरूर आहे, गुरा ढोरांना गोठ्याबाहेर काढावे लगेल, त्या दृष्टीने पुढील हालचाली केल्या पाहिजेत, अशी आमची समजूत होती. परंतु आजच्या पाण्याचा वाढण्याचा वेग काही आगळा वेगळाच होता. दुपारी २.३० वाजता आमच्या गोठयात पाणी शिरणार याची कल्पना आली आणि पुढील १०/१५ मिनिटात ते एक फूट वाढले. गुरे बाहेर नेण्याशिवाय पर्याय राहिला नाही. आमची जनावरे दुसऱ्या उंच जागी असलेल्या गोठयात नेली. त्यांना बाहेर काढेपर्यंत अर्धा तास सहज गेला. तो पर्यंत पाणी जवळ जवळ आणखी दोन फुटांनी वाढले. ही पातळीतील वाढ मात्र अतर्क्य होती. ज्यांचे गोठे सुरक्षित वाटत होते, त्यांच्या गोठयातून सुध्दा गुरे बाहेर काढणे भाग पडले.

दुपारी २.३० च्या मानाने जी पाण्याची पातळी होती तिच्यात पुढील एका तासात किमान २॥-३ फुटांनी वाढ झाली व काही करण्यास वेळ मिळण्यापूर्वीच ते आमच्या घरात शिरू लागले. पुढील १५ मिनिटांत सर्वात उंच असलेल्या घरात ते भरले. पाणी वेगाने वाढतच होते. घरांना कडया घालून अंगावर असलेल्या कपड्यानिशी बाहेर पडण्याशिवाय पर्याय उरला नाही. जवळच असलेल्या आमच्या बांधवाकडे सर्व आश्रयासाठी धावलो. हा हा म्हणता पाण्याची पातळी सायंकाळी पाचच्या मानाने नेहमीच्या पातळी पेक्षा सात/आठ फुटांनी वाढली. हताश होऊन हे सर्व पहात बसण्याशिवाय पर्याय नव्हता.

घरात घुसलेले पाणी व बाहेरून वेगाने येणारे पाणी आपला प्रताप दाखवू लागले होते. आत येणारे पाणी भितीना आपटून घुसळत होते. त्यामुळे जुन्या दीडशे वर्षांच्या भिंती पत्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळू लागल्या. काही दगडी खांब पडले. त्यावरील बार काही ठिकाणी लोंबकळू लागले. भिंती कोसळल्यामुळे घरातील हलके सामान पातेली, तांब्या - भांडी, डबे, सुपे, पाटया, कपडे आणि या सारख्या असंख्य वस्तू डोळ्यादेखत समुद्राकडे वाटचाल करू लागल्या.

भिंती कोसळल्यामुळे अनेक प्रकारचे सामान त्याखाली गाडले गेले. कप-बश्या सारखी चिनी मातीची भांडी, बरण्या, कांच सामान फुटून त्याची वाट लागली. सर्व कपडे भिजून आणि मातीत पडून त्यांचा नाश झाला. पाण्याच्या वेगाने घरातील बरेच सामान उलटे पालटे झाले. चार-चार माणसाना उचलणे त्रासदायक वाटणारे लाकडी सामान सुध्दा त्या जागेपासून ५०/६० फूटावर वाहून गेले. शेतकऱ्याच्या घरात अनेक प्रकारची चीज वस्तु, धान्य, दाणा गोटा असतो. पावसाळ्यापूर्वी अनेक वस्तू तयार केलेल्या असतात, त्यात लोणची, पापड, मुरांबा, फणस, आंबे पोळी, तिखट, मसाले, अशा अनेक तऱ्हा. शेतकामामुळे काही कामे करण्यास वेळ मिळत नाही म्हणून अनेक वस्तू आणून ठेवलेल्या असतात. त्या सर्वांची वाट लागली. घरात होत्याचे नव्हते झाले.

रात्री आठ वाजताच्या मानाने पाणी ओसरू लागले. रात्री २/२॥च्या मानाने ते सर्वात खालच्या पातळीवर गेले. **एक जुलै रोजी सकाळी आमची घरे, घरेच नव्हती. माती, दगड, भिजलेले कपडे, फुटलेले तुटलेले सामान, भिजलेले धान्य, उलटे पालटे झालेले स्टँड, कपाटे, बाहेरून आलेला चिखल, केरकचरा, घाण आणि असेच बरेच काही यांचे ते माहेर घर होते.**

घराबाहेरील स्थिती अशीच भयावह होती. असंख्य झाडे भुईसपाट झाली होती. माड, पोफळी, केळी,



Marathe Pratishthan

अननस यासारखी लहान-मोठी झाडे मोडून, वाहून त्यांचा पार निकाल लागला होता. बागांतून अनेक प्रकारचे काटे, कचरा, चिखल, ओला झालेला पालापाचोळा, लहानमोठ्या फांद्या यांचे ढीग अशा अनेक जंगली व आमच्याच घरातील काही वस्तू विखुरल्या होत्या. बागातून फिरणे कठीण झाले होते. जमीन संपूर्ण धुपून त्या ठिकाणी वाळू आणि छोटे दगड, गोटे यांचे ढीग साचले होते. पुढील किमान तीन-चार वर्षे त्यात शेती करणे शक्य होईल असे वाटत नाही. दगड मातीचे बंधारे तर असंख्य ठिकाणी फुटल्यामुळे पुढे उन्हाळी शेतीसाठी पाणी नेणे आज तरी शक्य वाटत नाही. येथला शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे.

वाडीतील पंधरा घरे आणि गुरांचे सहा गोठे यांना पुराच्या पाण्याने तडाखा दिला आहे. माणसाची गरजेची चीज वस्तू पुराने वाहून गेली. गाई-गुरांची वैरण पुराने साफ ओली चिंब झाल्यामुळे आता कुजून फुकट गेली आहे. **आजपर्यंत बेघर लोकांबद्दल वाचले होते, पाहिले होते, परंतु ते आमच्या पासून दूर होते. आज ते आमच्यापर्यंत आले. त्यावेळी आम्ही यथाशक्ती मदत केली, आज आम्हाला लोकांची मदत घेण्यावाचून पर्याय उरला नाही.**

आता आम्ही सावरत आहोत. पहिला धक्का जबरदस्त होता. जगून काय करावयाचे असा विचार मनात येत होता. सर्व उद्ध्वस्त झाले होते. परंपरागत घर पडून त्याचे कलेवर राहिले होते. शेती-बागायतीचे नुकसान अतोनात झाले. त्यावेळी योग्य, सारासार विचार करण्याच्या स्थितीत नसलेले मन आता उभारी धरत आहे. जे नाश पावले, लयाला मिळाले त्याचा विचार मागे सारून नवनिर्माण करण्याची आम्ही पराकाष्ठा करणार आहोत.

❖

# प्रतिक्रिया-कुलबांधवांचे कलादर्शन या कार्यक्रमाबाबत

१. आतापर्यंत आम्ही टी.व्ही. वरच मोठी-मोठी नावे वाचत आलो होतो. परंतु अशी माणसे-व्यक्ती आणि वल्ली-आपल्यासमोर येऊन उभ्या राहतील असे स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते. ते या कार्यक्रमात सत्यसृष्टीत आले.

बरीच वर्षे पुणेकरांनी कार्यक्रम करावे व आपण ते पहावे असे होत होते. मुंबईकरांना अशा कार्यक्रमाचे दर्शन होईल असे वाटले नव्हते. पण इथे सूर-ताल-स्वर आणि लय यांची एकरूपता झाली आणि कार्यक्रम अप्रतिम दृश्य आणि श्राव्य झाला. विशेषतः सौ. मालविका व सौ. मंजिरी मराठे या रोजच 'दूरदर्शन' देतात. उगाचच आपल्याला वाटत रहायचे की यांनी कधी प्रतिष्ठानमध्ये हजेरी लावली तर? त्या 'तर'चे 'उत्तर' त्यांनी या कार्यक्रमांत कथा सादर करून दिले.

उल्लेखनीय कथा सौ. सुलभा मराठे यांची. त्या कथेचे नाव लक्षात नाही. पण श्री. सबनीस मात्र आमचेकडे स्वयंपाकघरात दाखल झालेत त्या दिवसापासून! ह्या सबनीसांना घरातून बाहेर कसे काढावे हाच विचार मी करत आहे.

इतर कार्यक्रम वेळेअभावी आम्ही श्रवण करू शकलो नाही हीच एक खंत. तेही असेच उत्कृष्ट झाले असतीलच.

- **वामन गणेश** (पृ.५०३), नेरूळ, नवी मुंबई.

२. मी कुलबांधवांच्या कलादर्शन कार्यक्रमाला आलो होतो. कार्यक्रम अत्यंत चांगला झाला. मला एक सूचना करावीशी वाटते. यापुढे असे जे कार्यक्रम होतील त्यांचा उल्लेख दूरदर्शनवर (बातम्यात) करता येईल याची काहीतरी सोय करावी.

- **निलेश सदानंद खांबेटे** (पृ.६७६)
गोरेगांव (पूर्व), मुंबई

***(दूरदर्शनवर उल्लेखाची 'सोय' करणे सौ. मालविका वा सौ. मंजिरी मराठे यांना 'सोयिस्कर' असले तर आपली सूचना कार्यवाहीत येईल. - संपादक)***

३. आपण कलादर्शन कार्यक्रमात मला सहभाग दिल्याबद्दल मी खरोखरच आभारी आहे. आपणही स्टेजवर गावे अशी माझी खूप इच्छा होती. ती पुरी झाली म्हणून मला फारच आनंद झाला.

- **सौ. शुभदा पांडुरंग जोशी** (पृ.७४७),
बोरिवली, मुंबई

### होलसेल 'शुटिंग'

होलसेल 'शुटिंग'चा पत्ता मागील अंकात विचारला होता. कोणीही तो कळविला नाही. होलसेल 'शुटिंग'चे दुकान नायगांव, दादर येथे आहे. संट पॉल स्ट्रीट वर. आता तरी हे दुकान शोधून त्याचे पूर्ण नाव कळवाल? - **संपादक.**



Marathe Pratishthan

४. आपण कार्यक्रमाचा वृत्तांत व फोटोसह दिलेली सर्व माहिती वाचली व पाहिली. आनंद वाटला. आपण आमचे आभार मानलेत त्याऐवजी कौतुकाची थाप जास्त बरी वाटली असती. कारण आपल्याच माणसांनी आपल्या माणसांचे आभार मानू नये, उलट अधिकाराने, प्रेमाने यापुढील कार्यक्रमात सहभागी व्हावे असेच सांगावे.
**- गणेश मोरेश्वर जाईल** (पृ.७५७) कुर्ला, मुंबई.

५. आम्ही उभयतां २४ मे च्या कार्यक्रमाला आलो होतो. कार्यक्रम छानच झाला. उत्साहवर्धक होता. एकूण परिचित, नवपरिचित यांच्यात थोड्या वेळांत जो जिव्हाळा निर्माण झाला तो आम्हासारख्यांना अशा ठिकाणी पुन्हा-पुन्हा येण्यास उद्युक्त करील असा विश्वास वाटतो.

एक सूचना : एखादा कार्यक्रम वा समारंभ असा ठेवावा की ज्यात सर्वांना सहभागी होता येईल. कारण काहींना सर्वात मिसळण्याची इच्छा असते. पण व्यासपीठावर येण्याइतके धीटपण नसते.
**- सौ. अनघा अनिल** (पृ.२१८), पवई, मुंबई.

***(आपली सूचना चांगली आहे. पाहू कशी अंमलात आणता येते ते. पवई-विहारला सहलीचा कार्यक्रम कदाचित या दृष्टीने उपयुक्त ठरेल. - संपादक)***

❖

**कोणी काही म्हणा,**
**मला आपलं हे गाढवच आवडतं.**

माझ्या लहानपणी वसईला सार्वजनिक गणपती खूप थाटामाटात व्हायचे. साधारण महिना दीड महिना आमची मेळ्याची प्रॅक्टिस चाले. त्याचप्रमाणे रांगोळ्या, दोरीच्या उड्या, गोष्टी सांगणे म्हणजे हल्लीच्या शब्दांत कथाकथनाच्या स्पर्धा होत.

कथाकथनाच्या कार्यक्रमांत माझ्या चुलत्यांनी मला एक गोष्ट हातवारे करून म्हणायला शिकविली. शाळेच्या पुस्तकांत आम्हाला एक धडा होता. त्याचं नाव होतं, 'कोणी काही म्हणा, मला आपलं गाढवच आवडतं.' त्या गोष्टीत मला पहिले बक्षिस मिळाले. त्यानंतर घरात मला कित्येक दिवस चिडवत असत - 'कोणी काही म्हणा, मला आपलं 'हे' गाढवच आवडतं.'

**- मुंबईच्या नगरपाल उषाकिरण.**
(उषा बाळकृष्ण पृ. १९०),
'उष:काल' या आत्मचरित्रांतून

# खुषीपत्रे

१. 'हितगुज' जून १९९७ चा अंक मिळाला. एवढा लहान अंक परंतु माहिती फार मोलाची. घरांतील सर्वांनाच अंक आवडला. आजवर आम्हाला या उपक्रमाची माहिती नव्हती. त्यामुळे आम्ही खूप गोष्टींना मुकलो.
**- विष्णू प्रभाकर विद्वांस** (पृ.६५८)
माणगांव, जि. रायगड.

२. 'मराठे प्रतिष्ठान' मुंबई यांचे हितगुज हे मुखपत्र मला 'महाबळ' असूनही किंवा 'महाबळ' असल्यामुळेच वाचावयास मिळते. वाचनीयतेमुळे ते वाचताना आनंद होतो. पण आपण 'मराठे' नाही, उपरे आहोत, वाचण्याचा तसा आपल्याला राजरोस हक्क नाही या विचारामुळे आनंदाला विषादाची एक किनार असते.

पुढच्या जन्मी महाबळ म्हणून जन्माला आलो तर 'मराठे' मुलीशी विवाह करावयाचा व मराठे मुलगी म्हणून जन्माला आलो तर महाबळांच्या घरातील मुलगा निवडायचा हे मी ठरवून टाकले आहे.

तोपर्यंत 'हितगुज' हे मराठ्यांचे मुखपत्र न राहता मराठी भाषेतील उत्तम मासिक होईल याची मला खात्री आहे.
**- प्रा. भा. ल. महाबळ,** मुलुंड, मुंबई.

***('हितगुज' मार्फतच्या स्पर्धेचे परीक्षक म्हणून जबाबदारी स्वीकारून आपण मराठे परिवारात सामील झाला आहात. तेव्हा उपरेपणाचा विचारही मनात न आणता 'राजरोस'पणे हितगुज वाचनाचा आनंद घ्यावा. त्यासाठी पुढच्या जन्मापर्यंत वाट पहाण्याची गरज नाही. हितगुजच्या भविष्याबाबतची आपली भविष्यवाणी प्रत्यक्षांत येवो हीच इच्छा. याबाबतीत आपलेहि सहकार्य मिळेल अशी खात्री बाळगतो. - संपादक)***

३. जून १९९७ चा देखणा अंक मिळाला. दोन महिन्यांपूर्वीच संमेलनाचे आमंत्रण दिलेत ते बरे झाले.

२० वर्षाखालील स्पर्धकांना समस्यापूर्ती करायला बक्षिस आहे. श्लोक छान आहे. 'लालयेत पंचवर्षाणि दशवर्षाणि ताडयेत्' यात 'लाड' म्हणजे शिकवणे म्हणे! आणि मोत्या शिकत नाही म्हणून एखादी छडी! असाच एक श्लोक सुचवलो, मनुस्मृतीतला -

**विद्या विनयशीलस्य, नित्यं वृद्धोपसेविनः।**
**चत्वारि तस्य वर्धन्ते, आयुर्विद्या यशोबलम्।।**

**- जनार्दन गोविंद** (पृ.४०५) कोफराड, आगाशी.



Marathe Pratishthan

# स्वयंव्यवसाय चर्चा सत्रे : अंधेरी व मुलुंड

*मराठी माणसाच्या मानगुटीवर नोकरीचे भूत घट्ट बसले आहे. नोकरी तर मिळत नाहीच पण जाहिरातींच्या, एजंटांच्या आणि मुलाखतीच्या मृगजळामागे लागून जीव कासावीस झालेले तरूण ही विशेषत: ब्राम्हण समाजापुढील मोठीच समस्या आहे.*

*आपल्या समाजाची ही मनोभूमिका बदलण्याचा एक प्रयत्न म्हणून कुलबांधवांचे मेळावे आयोजित करावे. त्यात उद्योग-व्यवसायांत साहसाने प्रवेश केला, यशस्वी झाले असे कुलबांधव आणि अन्य मराठे व मराठी उद्योजक व्यावसायिक यांनी आपले भले-बुरे अनुभव मनमोकळेपणाने सांगावे, त्यावर चर्चा-प्रतिचर्चा व्हावी आणि या सर्व प्रक्रियेतून, विशेषत: तरुणांच्या मनात, उद्योग-व्यवसायातील अनिश्चित उत्पन्न आणि यशाबद्दल साशंकता यांची धास्ती थोडी तरी कमी व्हावी या उद्देशाने मराठे प्रतिष्ठानतर्फे मुंबईत अंधेरी येथे दि. १९ जुलै १९९७ रोजी आणि मुलुंड येथे ३० ऑगस्ट १९९७ रोजी स्वयंव्यवसाय या विषयावर चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती. त्यांचा हा वृत्तांत - संपादक*

## स्वयंव्यवसाय मेळाव्यांचे प्रयोजन

**- प्रतिष्ठानचे अध्यक्ष-सुरेशभाऊ**

अशा विभागीय मेळाव्यांचे आयोजन करण्याचे मुख्य कारण किंवा उद्देश त्या-त्या भागातील कुटुंबीय ह्या कार्यक्रमात सहभागी होऊ शकतील. व त्यानिमित्ताने जास्त जवळीक साधता येईल.

आपण नेहमी म्हणतो की मुलांनी नोकरीच्या मागे न जाता उद्योगधंद्यात पडावे. खरे म्हणजे 'पडावे' न म्हणता 'उतरावे' असे म्हटले पाहिजे. परंतु म्हणजे काय करावे हयाचे मार्गदर्शन होत नाही. त्या दृष्टीने काही विचार प्रास्ताविक म्हणून तुमच्या समोर मांडणार आहे.

कोणत्याही प्रकारचा उद्योग किंवा एखाद्या वस्तुची निर्मिती करावयाची असल्यास त्याचा विक्रीचा अनुभव आधी घेणे अत्यंत महत्वाचे आहे. असे केल्यामुळे बाजारात त्या वस्तूस असलेली मागणी व वाजवी किंमत ह्याचा अंदाज येतो व त्यानंतर ती बनवणे फायदेशीर आहे किंवा नाही ह्याचा निर्णय घेता येतो.

कोणताही उद्योग किंवा व्यवसाय सुरू केल्यानंतर यश येण्यास बराच काळ जावा लागतो. त्यामुळे करत असलेल्या कामाबद्दल पूर्ण श्रध्दा व सबूरी ही पथ्ये पाळणे फार महत्वाचे आहे. तसे न केल्यास फार लवकर अपयश येते. तसेच व्यवसाय करताना समाधानी वृत्ती असू नये; नेहमी प्रगती चालू पाहिजे. पण ह्याचा अर्थ निरनिराळी Diversification करावी असा अजिबात नाही. आपलाच धंदा जास्तीत जास्त वाढविण्याचा प्रयत्न करावा.



**मेळाव्यांचा उद्देश सांगताना सुरेशभाऊ (त्यांच्या डावीकडे 'व्हीके')**

अशा मेळाव्यात स्वयंरोजगार ह्या विषयास विशेष प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. पुढील काही वर्षात Service Industries ना खूप महत्व प्राप्त होणार आहे. अशा व्यवसायांना फारसे भांडवल लागत नाही. उदाहरणा दाखल काही सेवा पुढीलप्रमाणे असू शकतील.

१) कॉम्प्युटर डेटा फिडींग किंवा डी.टी.पी. युनिट.
२) टी. व्ही. / व्हीसीआर रिपेरिंग
३) रेल्वे टिकीट बुकींग, पर्यटन इ.
४) ईलेक्ट्रिक / प्लंबिंग

अशा खूप सेवांशिवाय बालवाडी, पाळणाघर, शिकवण्या, लायब्ररीज, शिवणकाम, खाद्यपदार्थ पुरवणे असे अनके व्यवसाय आज महिलाही करत आहेत.

आपणा सर्वांना माहीत आहे की गरज हीच कोणत्याही निर्मितीची जननी असते. ह्या गरजेमुळेच जगात असंख्य शोध लागलेले आपण पहातो. माझ्या



Marathe Pratishthan

माहितीत एक गृहस्थ सोसायटी व इमारतीतील फक्त पाण्याच्या टाक्या स्वच्छ धुण्याचे काम घेतात व वर्षभर पुरेल एवढे काम ते करतात. हल्ली भाजीसुध्दा चिरून मिळू लागली आहे. परवाच एकजण गमतीने सांगत होता की उल्हासनगरचा एक सिंधी गृहस्थ आगगाडीत खेळण्यासाठी पत्याचा कॅट भाड्याने पुरवितो व दररोज ५०/१०० कॅट, व ५ ते ७ मुले फक्त हेच काम करतात. तो आज लाखोपती आहे. अशी उदाहरणे पाहिल्यानंतर आपण तेवढे थोडे आहे.

मेळाव्यात अनुभवी व्यक्तींनी आपले अनुभव सांगावे. ज्यामुळे उपस्थितांना काही प्रेरणा व विचारांना चालना मिळेल. चर्चेतून निर्माण होणाऱ्या सर्वच मुद्यांना इथे कदाचित मार्गदर्शन करता येणार नाही. परंतु त्याची नोंद घेऊन फक्त तीन प्रश्न घेऊन त्या क्षेत्रातील कुलबंधूशी भेट घडवून आणण्याचा आम्ही निश्चित प्रयत्न करू असे मी आश्वासन देतो.

# स्वयंव्यवसाय मेळावा : अंधेरी - १९.७.९७

सभेच्या सुरवातीला प्रतिष्ठानचे कार्यवाह व्ही. के. (विनायक केशव - पृ.२०) यांनी उपस्थितांचे स्वागत केले. नंतर प्रतिष्ठानचे **अध्यक्ष सुरेशभाऊ** (सुरेश सखाराम पृ.३९९) **यांनी प्रास्ताविक करताना सांगितले** की या मेळाव्यांत कोणी-कोणाला मार्गदर्शन वगैरे करणे हे उद्दिष्ट नाही. धंद्या-व्यवसायात खरे मार्गदर्शन हे अनुभवातूनच मिळते. तरीही जे काही प्रश्न अनुत्तरित राहतात त्याबाबत तज्ञांशी, अन्य समानशील व्यक्तींशी संपर्क केल्यास त्यांचेही अनुभव आपल्या स्वतःच्या अनुभवांशी ताडून पाहता येतात, त्यातून काहीतरी मार्ग सापडतो.

कोणत्याही व्यवसायांत झटपट श्रीमंती मिळत नाही, सुरवातीला बराच काळ खूप मेहनत करावी लागते. स्पर्धेस तोंड देऊन मार्केट मध्ये पाय रोवावा लागतो. पण त्यामुळे खचून न जाता 'श्रद्धा व सबुरी' या साईबाबांच्या संदेशावर भरवसा ठेवून निष्ठेने काम केले तर यश मिळते असे सांगून ते पुढे म्हणाले की उत्पादक उद्योगांपेक्षा सेवा उद्योगावर, स्वयंरोजगारावर या चर्चासत्रांत प्रामुख्याने विचार व्हावा. कारण तुलनेने अशा व्यवसायांत भांडवल कमी लागते.



प्रोजेक्ट कंसल्टंट हेमंत महादेव

पंधरा-वीस वर्षे टाटा, पेप्सी यांसारख्या मोठ्या उद्योगांतल्या अनुभवाच्या पाठबळावर आज **व्यवसाय-मार्गदर्शन हाच व्यवसाय करणारे विलेपार्ले येथील मॅनेजमेंट आणि प्रोजेक्ट कन्सल्टंट हेमंत महादेव** (पृ.३२१) आणि गृहविज्ञान व आहारशास्त्राचे शिक्षण घेऊन **'पार्टी ॲरेंजर' हा व्यवसाय करणारी त्यांची पत्नी सौ. स्वाती हेमंत** यांनी या परिसंवादात 'नटी-सूत्रधारा'ची भूमिका बजावली. 'मार्केटिंग' हा यशस्वी व्यवसायाचा मूलमंत्र आणि 'मार्केट सर्व्हे' हा मूलाधार असल्याचे हेमंत मराठ्यांनी सांगितले तर मार्केट अस्तित्वातच पाहिजे असे नाही, तर लोकांना एखाद्या गोष्टीची गरज असल्याची जाणीव करून देऊन मागणी (म्हणजेच मार्केट) निर्माणही करता येते असे स्वातीने सांगितले. 'पार्टी ॲरेंजर' हा त्यांचा व्यवसाय हे याचे उत्तम उदाहरण.

व्यवसायात **यशस्वी होण्याचे काही ठोकताळेही** हेमंत मराठ्यांनी सांगितले. ते म्हणाले धंद्यात 'रिस्क' आहे. पण 'रिस्क' शिवाय 'गेन' नाही. स्वतःचा पैसा उद्योग व्यवसायात घातल्याशिवाय कामाची तळमळ (अर्ज टु सक्सीड) येत नाही. व्यवसायांतले नुसते 'ट्रेन्डस्' पाहून चालत नाही, तर 'ट्रेंड'चा सखोल अभ्यास करावा लागतो. ग्राहकाला मी स्पर्धकापेक्षा 'वेगळे' काय देणार त्याला महत्व असते. तसेच ग्राहकाला आपण 'प्रॉमिस'पेक्षा जास्त काय देतो त्यावर 'कस्टमर सॅटिसफॅक्शन' व 'कस्टमर लॉयल्टी' अवलंबून असते.

मार्केटिंग आणि मार्केट सर्व्हे इ. बाबतीत **अंधेरीचे कुलबांधव विजय भास्कर विद्वांस** (पृ.६२३) यांनी सांगितले की ते व्हेजिटेबल ऑईल रिफायनिंग प्लँटस् बनवतात. त्यांना मार्केट सर्व्हेची काही गरज पडत नाही. विक्री करणारे तज्ञ असले की झाले.



Marathe Pratishthan



अंधेरी मेळाव्यांतील प्रेक्षक - उजवीकडे राधा श्रीकांत व त्यांच्या शेजारी स्वाती हेमंत




डावीकडून सुलभा सुरेश व श्रीकांत धुंडीराज

यावर 'व्हीकें'नी सांगितले की त्यांच्या मामाने खोकल्याचे औषध तयार करण्यापूर्वी खोकला येणारे पेशंट किती प्रमाणात असतात त्याचा सर्व्हे केला होता. कंझुमर प्रॉडक्टच्या बाबतीत मार्केट सर्व्हेचे महत्त्व त्यांनी सुमारे ६० वर्षांपूर्वी ओळखले होते.

'मार्केटिंग'चा धागा पकडून **भेटवस्तूंचे निर्माते डोंबिवलीचे अशोक यशवंत** (पृ.३२१) म्हणाले की ते १५ वर्षांपूर्वी नोकरी सोडून मार्केटिंग व्यवसायांत पडले. सुरवातीला गावोगाव हिंडून माल खपवताना खूप अडचणी आल्या. पण नाउमेद न होता, चिकाटीने, जिद्दीने काम चालूच ठेवले. आज ते स्वतः तर या व्यवसायात समाधानी आहेतच पण स्वतःबरोबरच इतरांनाही मदत मार्गदर्शन करतात. ते म्हणाले, 'मालाचा उत्पादक १० टक्केच नफा कमावतो, पण माझ्यासारखा 'सेलर' १०० टक्के कमावतो. महाराष्ट्रीय लोक ऐदी आहेत असे महाराष्ट्राबाहेरचे लोक म्हणतात असेही त्यांनी सांगितले. याबाबत गंभीरपणे विचार व्हायला नको काय?

**आयुर्वेदिक औषधांचे उत्पादक पार्ल्याचे उदय वसंत पेंढरकर** 'व्हीकें'च्या खास निमंत्रणावरून या चर्चासत्रात आले होते. त्यांनी सांगितले की शरीराशी आतून किंवा बाहेरून संबंध येणाऱ्या वस्तूंच्या विक्रीत ब्रँडला फार महत्व आहे. यासाठी सातत्याने दीर्घकाळ प्रयत्न करावे लागतात. ब्रँडेड कन्झुमर प्रॉडक्टच्या विक्रीच्या



अंधेरी मेळाव्यातील प्रेक्षक - पुढील ओळीत डावीकडून विजय भास्कर विद्वांस, अशोक यशवंत आणि उदय वसंत पेंढरकर

यशात ५० टक्के वाटा मार्केटिंगचा, २० टक्के मालाच्या दर्जाचा आणि ३० टक्के अनुकूल सरकारी धोरणाचा असतो. त्यांनी आवळ्याचे सरबत बाजारात एस्टॅब्लिश केले. मोठ्या प्रमाणांत उत्पादन करण्यासाठी कारखाना विस्ताराची योजना कार्यान्वित केली आणि अचानक बाजारात धूमधडाक्याने 'रसना' पेये अवतरली. पेंढरकरांची विक्री एकदम घटली. पण त्यांनी धीर सोडला नाही. त्यांच्या स्वीटॅब्लिका पेयांतील औषधी गुणधर्म पडताळून पाहून त्यांचेवर भर देऊन विशिष्ट ग्राहकवर्ग डोळ्यांपुढे ठेवून विक्रीसाठी प्रयत्न केले आणि ते पुन्हा उभे झाले. आज विशेषतः ऑर्थेपिडिक सर्जनमध्ये स्वीटॅब्लिका फार लोकप्रिय पेय आहे व परदेशांतही मोठी बाजारपेठ मिळाली आहे असेही पेंढरकरांनी अभिमानाने सांगितले.

आणखी एक **निर्यात व्यापार करणारे नव-उद्योजक सचिन माधव दणगे,** 'व्हीकें'चे नातेवाईक, हेहि खास निमंत्रित म्हणून उपस्थित होते. त्यांनी निर्यातीशी संबंधित उद्योग चालू करायचे ठरविले. एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलकडून यासाठी काय काय करावे लागते याबद्दलची सर्व माहिती मिळवली व ३-४ महिने कोणत्या मालाला कुठे मागणी आहे याबाबत बारकाईने अभ्यास करून त्यांनी धंदा सुरू केला आणि पहिल्याच वर्षी १० लाखांची उलाढाल झाली. या वर्षी आतापर्यंत ४ महिन्यात १२ लाख उलाढाल झाल्याचेही त्यांनी सांगितले.

युरोप, अमेरिका, आखाती प्रदेशांत क्वालिटी कंट्रोल फार स्ट्रिक्ट असतो. त्या मानाने अफ्रिकेत दर्जाबाबतची स्टॅंडर्डस् जरा कमी जाचक आहेत. तिथे भारतीय लोक इंपोर्टरहि आहेत.

एखाद्या देशांत कोणत्या मालाला मागणी आहे ते अजमावून तो माल कुठे मिळू शकेल ते पहावे लागते, असे सांगून श्री. दणगे म्हणाले की, 'टेरी टॉवेल' बाबतची चौकशी आल्यामुळे ते गेले ६ महिने सोलापूर भागात याबाबत शोध घेत आहेत. 'रबिंग-टेस्ट' करून टॉवेल लवकर चुरगळतो काय तसेच उन्हात अगर धुण्यामुळे रंग विटणार नाही ना याबाबत चाचण्या सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या
व्यवसायांत येऊं इच्छिणाऱ्या कुलबांधवांना त्यांचे अनुभव आश्वासक तसेंच मार्गदर्शकही ठरावे.

स्वत:ची नोकरी संभाळून सुमारे **१५ वर्षे गुंतवणुक-सल्लागार एजंट म्हणून काम करणारे**



सदानंद विष्णु

**सदानंद विष्णु** (पृ.४१७) म्हणाले की, 'या व्यवसायात 'रिस्क' नाही. भांडवलही काहीच लागत नाही. नोकरी संभाळून कोणीही हा व्यवसाय करू शकतो. एकदा तुम्ही ग्राहकाचा विश्वास संपादन केलात की तो सहसा दुसरीकडे जात नाही. ते स्वतः गुंतवणुकीबरोबर इन्कम टॅक्स इ. बाबतही सल्ला देतात.'

**धंदा करण्याची इर्षा असणारे श्रीकांत धुंडीराज** (पृ.३७८) आणि भावी काळात नोकऱ्या मिळणार नाहीत या संदर्भात मुलांसाठी घरात कॉम्प्युटरचे वातावरण निर्माण व्हावे म्हणून **कॉम्प्युटर घेऊन डीटीपी व्यवसाय चालू करणारी त्यांची पत्नी राधा** या दोघांनीही आपले मौलिक अनुभव सांगितले. **श्रीकांत धुंडीराज** यांनी शिक्षण बी.एस्सी. असूनही केमिकल इंजि. फॅक्टरी उभारणीचे काम चालू असताना सिव्हिल इंजिनिअर काम सोडून गेल्यावर नव्यानेच सिव्हिल इंजिनिअर झालेल्या अननुभवी इंजिनिअर नेमून त्याच्या मदतीने रु. २२ लाखांचे फॅक्टरी उभारण्याचे काम करून घेतल्याची थ्रिलींग हकिकत सांगितली. ते म्हणाले, "कामात रस, चौकसपणा आणि अभ्यासू वृत्ती असली तर कोणत्याही व्यवसायांत यशस्वी होता येते. दर तीन-चार वर्षांनी नोकऱ्या बदलल्यास अनुभव वाढत जातो. तसेच दर बदलाचे वेळी निदान दोन-तीनशे रुपये तरी वाढीव पगार मिळतोच." धंदा करण्याची इच्छा पूर्ण करता यावी म्हणून सुरवातीच्या काळांत आपण सकाळी ७ ते दुपारी ३ नोकरी होताच एका इलेक्ट्रीकल मटेरियलच्या दुकानात पार्टटाईम नोकरी करून या व्यवसायाचे ज्ञान घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

**सौ. राधा श्रीकांत** यांना मुले मोठी झाल्यावर मोकळा वेळ मिळू लागला. खा, पी, मजा कर, फार तर महिला मंडळात जा हा विचार त्यांना पसंत नव्हता. काही तरी व्यवसाय करण्याची जबरदस्त ओढ त्यांना होती. मुले सांभाळण्याचा व्यवसाय करायचा तर प्रतिष्ठेची कल्पना आड आली. फॅशन मेकर घेऊन फॉल-पिकोचाही व्यवसाय करून पाहिला. कुतूहल म्हणून कॉम्प्युटरचे शिक्षण घेतले. यांतून कल्पना आली -डीटीपी व्यवसायाची. लेखकांचे लिखाण सर्वांआधी वाचायला मिळेल हा



Marathe Pratishthan

एक हेतु. तसेच एका तरी मुलाला कॉम्प्युटर व्यवसाय मिळेल हाही छुपा हेतु होताच असे सांगून त्यांनी सांगितले की यासाठी भांडवल उभारणी करणे फार कठीण गेले. भावा-बहिणींना साकडे घालून त्यांचेकडून पैसे घेऊन मशीन घेतले आणि स्वतःच्या जिद्दीवर डीटीपी व्यवसाय सुरू केला असेही त्यांनी अभिमानाने सांगितले.



अश्विनी शिरीष

स्वतःचे कॉम्प्युटर क्लासेस चालू करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या **स्त्री उद्योजक सौ. अश्विनी शिरीष** (पृ.३९२) यांनी सांगितले की व्यवसायांत मार्केटिंगप्रमाणेच जागा व बँक फायनान्स याही अडचणी येतात. यावर कन्सल्टन्सी व्यवसाय करणारे हेमंत मराठे यांनी सांगितले की अनेक आजारी उद्योगांची जागा मिळण्याची शक्यता असते. तसेच जागा, फायनान्स इ. बाबतीतली सर्व माहिती राज्य सरकारकडून उद्योजकांना मिळू शकते. तसेच सुशिक्षित बेकार योजनेखाली सवलतीच्या व्याजाने कर्जाच्याहि योजना असल्याचे त्यांनी सांगितले.

१९९६ मध्ये **मेकॅनिक इंजिनिअर झालेला अमोल अजित वीरकर** हाहि **ग्राफिक डिझायनर कु. शर्मिला रविंद्र** (पृ.४६७) या त्याच्या मैत्रिणीच्या आग्रहाखातर या चर्चासत्रात उपस्थित होता. त्याच्या वडिलांचा बांधकामाचा व्यवसाय असूनही २/४ वर्षे कोणाच्या तरी हाताखाली काम केले तर अनुभव मिळतो म्हणून तो स्वतः सुमीटोमो सायकल कंपनीत सर्व्हिस इंजिनियर म्हणून काम करतो असे त्याने सांगितले.

**इंजिनिअरिंगच्या तिसऱ्या वर्षात शिकणारा पुष्कराज वामन** (पृ.५०३) याने सुटीतील मार्केट सर्व्हेच्या कामाचे त्याचे रंजक पण तितकेच बोधप्रद अनुभव सांगितले. एका एजन्सीमार्फत त्याचे सिलेक्शन झाले. लोकप्रभा साप्ताहिकासाठी घरोघर जाऊन वर्गणीदार मिळवण्याच्या कामावर त्याची नेमणूक झाली. दिवसाला किमान तीन वर्गणीदार मिळवण्याचे उद्दिष्ट त्यांना देण्यात आले. पहिल्याच दिवशी एका माणसाने त्यांना योगाबाबत व्याख्यान देण्यात दीड तास घेतला. जोगेश्वरीच्या एका प्रोफेसरने घरी जाऊन ट्युशन घ्यायचे प्रपोजल दिले. परिणाम दोन दिवसानंतर कंपनीने ब्रेक दिला. मात्र आठ दिवसानंतर पुन्हा बोलावून घेतले. मला नीट मार्गदर्शन केले. पुन्हा कामाला लागलो.

नंतर पनवेलला एका नातेवाईकाच्या हॉटेलात कॉलेज संपल्यावर संध्याकाळी जाऊन काम करू लागलो. रात्री १२॥-१ पर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रातल्या लोकांचे अनेक नमुने पहायला मिळाले. मॅनेजिंग पर्सन्स इज मोस्ट इंपोर्टंट याची जाणीव झाली.

पुष्कराजने व्यवसायाच्या दोन अफलातून कल्पना मांडल्या. एक म्हणजे टी.व्ही. वरच्या डिस्कव्हरी चॅनेलवरील कार्यक्रमातील खूप इनोव्हेटिव्ह कल्पना उचलून डेव्हलप करता येतील. दुसरी त्याची आयडिया सानपाड्याला भाजी मार्केटात भाजी खरेदी करून किरकोळीने घरोघरी विकायची. भावात ७५ टक्के ते १०० टक्के फरक असतो.

**गोव्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजांत शिकणाऱ्या कु. चेतना श्रीहरी** (पृ.११६) हिने गोव्यांत पॅकेजिंग मटेरियलच्या मागणीचा मार्केट सर्व्हे करतानाचा अनुभव सांगितला. तिच्या एका नातेवाईकाला थर्मोकोल फॅक्टरी सुरू करण्याची पूर्वतयारी म्हणून हा सर्व्हे करायचा होता.

**नंदुरबारची, आता मुंबईत राहून कॉम्प्युटर शिक्षण घेणारी कु. भारती विद्याधर** (पृ.१५३) हिने सॅनिटरी टॉवेल निर्माण करून विशेषतः जिल्हा पातळीवर स्वस्तांत विकता येतील काय याबाबतचे विचार मांडले असता कन्सल्टन्ट हेमंत महादेव यांनी सांगितले की यासाठी मार्केट सर्व्हे करून मगच काळजीपूर्वक पावले टाकायला हवी.

**या चर्चासत्राचे निमंत्रक कार्यकारी मंडळाचे सदस्य सीताराम गोपाळ खांबेटे** (पृ.६७६) यांनी सांगितले की मार्केट सर्व्हेचे काम करण्याची ज्यांची तयारी आहे. त्यांना परळला म्हात्रे पेन कंपनीच्या जवळ असणाऱ्या आय. एम्. आर्. डी. या कंपनीकडून काम मिळू शकते.

**हितगुजचे संपादक लक्ष्मण शंकर** (पृ.५२०) यांनी सर्व उपस्थित कुलबांधव आणि खास निमंत्रित यांचे आभार मानले. विशेषतः महिला उद्योजक आणि तरुणांची उपस्थिती आणि चर्चेतला सहभाग या गोष्टी कुलबांधवांमध्ये नवी जाणीव निर्माण होत असल्याच्या निदर्शक आणि म्हणूनच आश्वासक, शुभसूचक असल्याचे त्यांनी सांगितले. ❖



Marathi Pratishthan

# स्वयंव्यवसाय मेळावा : मुलुंड - ३०.८.९७

श्री. ल. शं. मराठे, संपादक, हितगुज यांनी सर्व उपस्थित कुलबांधवांचं स्वागत करताना सांगितले की मार्गदर्शन करू शकणारे व मार्गदर्शाची अपेक्षा करणारे यांची गांठभेट लेखनाच्या स्वरुपात हितगुजमध्ये होऊ शकेल. उपस्थित कुलबांधवांनी आपआपली ओळख सर्वांना करून दिली.

आपल्या प्रास्तविक भाषणात अध्यक्षांनी या उपक्रमाला अंधेरी येथे उत्तम प्रतिसाद मिळाल्याचे सांगून अशा चर्चासत्रांच्या उद्देशांबद्दल विवरण करताना सांगितले की इतरांचे व्यवसायांतील अनुभव ऐकताना आपोआपच आत्मपरीक्षण होते. कोणताही व्यवसाय सुरू करताना संभाव्य बाजारपेठेची संपूर्ण माहिती हवी. मालाच्या उत्पादनानंतर बाजारपेठेची शोधाशोध करणे ही अपयशाची पहिली पायरी ठरते. तसेच संयम हा आवश्यक गुण आहे. आज सुरवात, उद्या प्रगती, परवा यशाचे शिखर, हे गणित चुकीचे ठरते. आपल्या अंगी चिकाटी पाहिजे. उत्पादनाचा उत्तम दर्जा आपल्याला देशातर्गत व भारताबाहेरची स्थिर बाजारपेठ मिळवून देतो. माझ्या स्वतःच्या बाबतीत सांगायचे तर १९७३ साली आयात पारितोपिक मिळाले व आता अमेरिकेबरोबर करार करण्यापर्यंत मजल मारली. माझ्या मते सेवाप्रधान Service Oriented उद्योगाला तरुणांनी अधिक महत्त्व द्यावे. त्याला भांडवली खर्च लागत नाही. व्यवसायाचे अचूक ज्ञान व सेवाभावी वृत्ती हेच प्रधान भांडवल असते.

अशा प्रकारची चर्चासत्रे अत्यंत उपयोगी आहेत यात शंकाच नाही. पण पुढची पायरी म्हणजे समान व्यवसाय असणाऱ्या कुलबांधवांची गटचर्चा Group Discussion. या गटांमध्ये उपस्थितांची संख्या कमी असल्यामुळे वातावरण अनौपचारिक राहते; वैयक्तिक अडचणी, अनुभव, विचारांची देवाण-घेवाण अत्यंत फलदायी स्वरूपांत होते.

आपापले अनुभव सांगताना उपस्थितांनी खालीलप्रमाणे विचार मांडले.

**हेमंत मराठे** (पृ.३२१) - पूर्वतयारी म्हणून संभाव्य बाजारपेठेची पूर्ण माहिती हवी. चुका होणारच पण त्यांची पुनरावृत्ती नको. मिळकतीपेक्षा नेहमी खर्च कमी करावा, हा सामान्य नियम. पण काही यशस्वी उद्योजक आवश्यक भासल्यास काही बाबतीत खर्च जास्त करतात व इतर ठिकाणी हात आखडता घेतात. यात शेवटी ज्यानी त्यानी आपल्या अनुभवावरून निर्णय घ्यायचा असतो.


सुहास कुंटे

**सुहास कुंटे** (निमंत्रित)- सुरवातीला गुलब पुष्पे, अगरबत्ती वगैरे छोटे व्यवसाय केले. नंतर व्यवसाय क्षेत्रे विकसित करीत सध्या उद्यान विकास उद्योग Garden's Guardian करतो. ५०/६० माणसे माझ्याकडे आहेत. एक संस्थाचालक म्हणून - मालक नव्हे - मी नोकरवर्गाला सर्व तऱ्हेच्या सवलती दिल्या आहेत. भविष्य निर्वाह निधी, रजेच्या सवलती त्यापैकी आहेत. कोणत्याही तरुणाला मी मार्गदर्शन आनंदाने करीन.

**शिरीष अनंत** (पृ.३९२) - कोणत्याही व्यवसायाला पुस्तकी ज्ञान उपयोगी पडत नाही. Software व्यवसायात अनुभवच उपयोगी पडतो. तसेच वक्तशीरपणा अतिशय आवश्यक आहे. Hardware सुद्धा महत्वाचे क्षेत्र आहे. इंटरनेटमध्ये काम करण्याची मी जिद्द बाळगून आहे. आपले कुलबंधू हेमंत मराठे यांचे मला उत्तम मार्गदर्शन मिळत आहे.

शिरीष मराठे यांचे मित्र **नितीन मडकैकर** यांनी इंटरनेटची सविस्तर माहिती दिली.

त्यानंतर उत्स्फूर्तपणे श्री. हेमंत मराठे यांनी इंटरनेटचा आपल्या दैनंदिन आयुष्यात खूप उपोयग होत असल्याचे सांगून इंटरनेटवर जाहिरात अतिशय फायदेशीर ठरेल असे सांगितले.

**सौ. स्वाती हेमंत** (पृ.३२१) - मेजवानीची सर्व व्यवस्था अगदी रोषणाईसह करणे, सहली आयोजित करणे हा माझा व्यवसाय आहे. माझा व्यवसाय नाविन्यपूर्ण आहेच पण कामातील आनंद Job Satisfaction देणारासुद्धा आहे. मागणी म्हणजेच बाजारपेठ निर्माण करणे हेच खरं कौशल्याचं काम आहे. सहली आनंददायक करणं हा व्यवसाय आहेच पण ती एक कलासुद्धा आहे. स्त्रियांना हा व्यवसाय कदाचित कठीण असेल पण अशक्य नाही. आत्मविश्वास हवा.

**डॉ. सुप्रिया रघुनाथ** (पृ.२४७) - मराठी माणूस



Marathe Pratishthan

तसा फटकळच उलट गुजराथी माणूस बघा-आतथ्यशील स्वभावानी तो नकोसा होत नाही. आपणाकडे येणारे ग्राहक आपण V.I.P. मानले पाहिजेत. कंपाउंडरची वाट न पाहता मी स्वतः रुग्णाची सोय पहाते. माझ्या अनुभवावरून मी सांगते की होमिओपॅथीचे उपचार फारच चांगले असतात.

**डॉ. सुरेंद्रनाथ** (पृ.२८४) - पुणे संमेलनात मी एक प्रस्ताव मांडला होता-शिक्षण पुरे केलेल्यांना अनुभव प्राप्त करून देणारे उद्योजक मिळतील अशी योजना आखावी. यावर **श्री. मनोहर चक्रदेव** (पृ.७३२) यांना सांगितले की स्पेशल पर्पज मशीन उद्योगात मी जरूर मार्गदर्शन करीन. तसेच **श्री. आनंदराव मराठे** (पृ.२७७)



आनंदराव मराठे



मनोहर चक्रदेव

यांनी सांगितले की सुवर्णकाराच्या व्यवसायात मी जरूर मार्गदर्शन करीन. त्यांच्या शिक्षणानीसुद्धा व्यवस्था करीन. चित्रकलेची प्राथमिक माहिती हवी. दोन वर्षाच्या शिक्षणानंतर कारागिराला उत्तम प्राप्ती होते.



द. वि. खांबेटे

**श्री. द. वि. खांबेटे** (पृ.७०४) - लघुउदयोगाला प्रोत्साहन देणे हाच माझा व्यवसाय आहे. (ते MSFC मध्ये वरिष्ठ अधिकारी आहेत) माझ्याकडे भागीदारीतील व्यवसाय, पूर्ण मालकीचा व्यवसाय यासाठी खूप प्रस्ताव आहेत. डॉक्टर नसताना रुग्णालयाचा व्यवसाय आपण करू शकतो. लहान सहान उद्योगांना शासनातर्फे व लघुउद्योग मंडळातर्फे खूप मदत केली जाते. आशा सोडून दिलेल्या अनेक अयशस्वी उद्योजकांना मी धीर देऊन मार्गदर्शन करून यशस्वी केले आहे.

**अभिजित फडणीस** (पृ.२२७) - व्यवसाय सोडून नोकरीत गेलो पण पलायन म्हणून नव्हे. मला निरनिराळ्या पदांकरिता देकार आले आणि प्रत्येक संधीचा मी फायदा घेतला. काही गुण अंगभूत असतात काही कष्टसाध्य असतात. माझ्या मते आपले क्षितिज विस्तीर्ण हवे. आपली झेप उत्तुंग हवी.



अभिजीत फडणीस

आपण विशाल व्यासपीठ गाजविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली पाहिजे. आपल्या व्यवसाय संचारासाठी आपण आंतरराष्ट्रीय प्रांगणाची तयारी ठेवली पाहिजे. अपयश नव्हे तर संकुचित व्यवसायकक्षा हाच खरा अपराध आहे.

**सौ. सुलभा सुरेंद्रनाथ** (पृ.२८४) - मला प्रदर्शनात स्टॉल ठेवायचा आहे. तर दुसरीकडून वस्तू आणून विक्री करताना कोणती कार्यपद्धती अवलंबावी लागते?

**श्री. श्रृंगारपुरे** (श्री. खांबेटेद्वारा निर्मंत्रित) यांनी त्यांच्या Amways Corporation या संस्थेबद्दल माहिती सांगितली.

कार्यवाह **श्री. वि. के.** (पृ.२०) यांनी उपस्थितांचे आभार मानताना गटचर्चा मंडळांची लवकरच कार्यवाही होईल व संबंधित व्यक्तींना पुढील कार्यक्रम कळविण्यात येईल असे आश्वासन दिले.

❖

**फार तर ऑर्डर देणार नाहीत, गोळी तर घालणार नाहीत?**

अशोक मराठ्यांचा एक मित्र. त्याची कंपनी बंद पडली होती. अशोक मराठ्यांनी त्याला मालाची ऑर्डर मिळवण्यासाठी पाठवले. सुरवातीच्या ४-५ दुकानदारांनी ऑर्डर दिली नाही. नाउमेद होऊन तो अर्ध्या वाटेतूनच परत आला. अशोक मराठ्यांनी त्याला परत पाठवले. 'फार तर ऑर्डर देणार नाहीत, गोळी तर घालणार नाहीत?' असे सांगून त्याचा न्यूनगंड घालवला. मग स्वतःबरोबर त्याला दीड एक महिना फिरवले. तीन महिने त्याने प्रामाणिकपणे अशोकरावांकडे काम केले. तीस-पस्तीस हजारांची कमाई झाली. त्याचा न्यूनगंड गेला. नंतर तो स्वतंत्रपणे काम करू लागला.



Marathe Pratishthan

## निर्माल्याचा रतीब

विलेपार्ले येथील सौ. राधा श्रीकांत (पृ.३७८) यांनी एका गमतीदार व्यवसायाची माहिती दिली. एका भाविक आईचा सुविद्य मुलगा नोकरीला जाताना नदीत विसर्जन करण्यासाठी निर्माल्याची पुडी न्यायला खळखळ करायचा. रोज त्यांची होणारी वादावादी दुधाचा रतीब घालायला येणारा मुलगा ऐकायचा. एक दिवस त्याने आईला सुचविले की मी रोज तुमचा निर्माल्य नेऊन टाकीन. मला तुम्ही महिन्याला पाच रुपये द्या. झाले. निर्माल्य टाकायचे एक गिऱ्हाईक मिळाले. त्या कल्पक मुलाने दुधाचे रतीब घालता घालता निर्माल्य टाकण्याचेहि पन्नास-साठ रतीब मिळवले.

***(एखादा कल्पक उद्योजक अशा निर्माल्यापासून कंपोस्ट खत निर्माण करून विकण्याची कल्पना तर लढवणार नाही ना? - संपादक)***


सुबक, सुंदर, व्याकरण-शुद्ध
इंग्रजी व मराठी अक्षर-जुळणी

**भाग्यश्री**

**सौ. राधा मराठे,**
३/४१, जुहूदर्शन, न्यु डी. एन. नगर, अंधेरी (पश्चिम)
मुंबई ४०० ०५३. (दूरभाष-६२३ १०६२)


### या अंकात


१. हितगुज रत्नागिरी अधिवेशन विशेषांक ..... पृ.१
२. रत्नागिरी अधिवेशनासाठी स्वागत समिती ... पृ.१
३. आदर्श माता पारितोषिक रु.१०००-निकष ...पृ.३
४. खुडीपाटकरांनी भोगलेला प्रलयंकारी महापूर पृ.५,६
 - वसंत रावजी मराठे.
५. प्रतिक्रिया-'कुलबांधवांचे कलादर्शन'बाबत.. पृ.७,८
६. मला आपलं हे गाढवंच आवडतं .......... पृ.८
७. स्वयंव्यवसाय मेळाव्यांचे प्रयोजन ....... पृ.९,१०
 - प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेशभाऊ
८. स्वयंव्यवसाय मेळावा अंधेरी ........ पृ.१०-१३
९. स्वयंव्यवसाय मेळावा मुलुंड ....... पृ.१४-१५
१०.फार तर ऑर्डर देणार नाहीत,
 गोळी तर घालणार नाहीत? ................ पृ.१५
११.निर्माल्याचा रतीब ......................... पृ.१६


याशिवाय प्रतिष्ठान वृत्त (पृ.२), सभासद वृत्त (पृ.३,४), खुषीपत्र (पृ.८), आणि समस्यापूर्ती (पृ.४) ही नेहमीची सदरे.

बुक पोस्ट

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan